**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (**जिल्हा**)**:** कोल्हापुर **P.S.**(**ठाणे**)**:** शिवाजी नगर

**FIR No.**(**प्रथम खबर क्र.**)**:** 0720 **Year** (**वर्ष**)**:** 2025

**Date and Time of FIR** (**प्र. ख. दिनांक आणि वेळ**)**:**07/11/2025 04:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (**गुन्ह्याची घटना**)**:**

1. **Day**(**दिवस**)**:** गुरूवार

**Time Period** (**कालावधी**)**:**

**Date From** (**दिनांक पासून**)**:** 06/11/2025

**Date To** (**दिनांक पर्यंत**)**:** 06/11/2025

**Time From** (**वेळेपासून**)**:** 13:06 बजे

**Time To** (**वेळेपर्यंत**)**:** 16:51 बजे

(b) **Information received at P.S.** (**माहिती मिळालेले पोलीस ठाणे**)**:**

**Date** (**दिनांक** )**:** 06/11/2025 **Time** (**वेळ**)**:** 18:30 बजे

(c) **General Diary Reference** (**रोजनामचा संदर्भ** )**:**

**Entry No.** (**नोंद क्र.**)**:** 006

**Date & Time** (**दिनांक आणि वेळ**)**:** 07/11/2025 03:23 बजे

4. **Type of Information** (**माहितीचा प्रकार**)**:** लेखी

5. **Place of Occurrence** (**घटनास्थळ**)**:**

1.(a) **Direction and distance from P.S.**(**पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर**)**:**

उत्तर, 2 किमी **Beat No.** (**बिट क्र.**)**:**

(b) **Address** (**पत्ता**)**:** इचलकरंजी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (**या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास**)**:**

**Name of P.S.**(**पोलीस ठाण्याचे नाव**)**:**

**District(State)** (**जिल्हा**(**राज्य**))**:**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : . अशोक सानप

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्,कोल्हापूर,शिवाजी नगर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्,कोल्हापूर,शिवाजी नगर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश विष्णुपंत सोनवणे | | वडील का नाम : विष्णुपंत सोनवणे | 1. जयसिंगपूर, ता शिरोळ, जिकोल्ह,शिरोळ,शिवाजी नगर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | नेताजी केशव पाटील | | वडील का नाम : केशव पाटील | 1. शहापुर, ता हातकणंगले, जिकोल,शहापुर,शिवाजी नगर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
10,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद दिनांक - 07/11/2025

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष शिवाजीनगर जि.कोल्हापूर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 03/11/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांनी सायंकाळी 05.15 वाजता त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन कळविले की, तक्रारदार संतोष राऊ काशीद वय 35 वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी, रा.गणेशनगर, गल्ली नं.3, इचलकरंजी, ता. हातकणंगले जि.कोल्हापूर मो.नं.9370336223 यांनी दिनांक 03/11/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरोच्या मोबाईल नंबर वरती ऑनलाईन तक्रार केली असुन,त्याबाबत त्यांना त्यांचे वरील मो.नं वर फोन करून तक्रार विचारली असता, त्यांनी सांगितले की, शहापुर(इचलकरंजी) येथील तलाठी कार्यालयातील तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील हे त्यांचे वडील राऊ परसु काशीद यांचे इचलकरंजी येथील गट नंबर 729 मधील क्षेत्रास त्यांचे वडीलांचे नाव खरेदीनंतर फेरफार होवुन 7/12 पत्रकी नोंद करणेकरीता 25,000/- लाच मागणी करीत आहेत. अशी तक्रार सांगुन, ते दिनांक 06/11/2025 रोजी तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांना भेटणेस जाणार आहेत. असे सांगुन त्यादिवशी तक्रारी अर्ज देत आहे, असे कळविले. तरी तुम्ही तक्रारदार काशीद यांचे संपर्कात राहुन दिनांक 06/11/2025 रोजी कारवाई करणेबाबत समक्ष कळविले.

दिनांक 06/11/2025 रोजी मी तक्रारदार काशीद यांचे असे संपर्कात होतो. आम्ही जिल्हा हिवताप कार्यालय कोल्हापूर येथुन दोन शासकीय पंच बोलावुन घेतले. काशीद यांनी आम्हाला शरद इनस्टीटयुट सांगली रोड, इचलकरंजी चे जवळ असले ओकारेश्वर मंदिर येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी, सापळा पथक, दोन शासकीय पंच असे शासकीय वाहनातुन कोल्हापूर सांगली फाटा, इचलकरंजी असे ओकारेश्वर मंदिर या ठिकाणी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार हजर होते. तक्रारदार काशीद, सापळा पथक व पंचाची ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार काशीद यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली की, मी वरील ठिकाणी राहणेस असून मी खाजगी नोकरी करीत असतो. माझे वडील राऊ परसु काशीद यांचे नावे इचलकरंजी येथील गट नं. 729 मध्ये असले क्षेत्राचे 7/12 पत्रकी खरेदीनंतर फेरफार होवून नावाची नोंद होणेकरीता मी वडीलांचे नावे सजा शहापुर, (इचलकरंजी) ता.हातकणंगले, या तलाठी कार्यालयात दिनांक 03/11/2025 रोजी अर्ज दिला होता. त्यावेळी तलाठी कार्यालयात तलाठी सोनवणे हे व कोतवाल पाटील असे हजर होते. मी अर्ज दिलेनंतर शहापुर तलाठी कार्यालयातील कोतवाल पाटील यांनी मला तलाठी सोनावणे यांचे टेबलजवळ बोलावून घेतले व मला इचलकरंजी येथील गट नं. 729 मधील असले क्षेत्रास माझे वडील राऊ परसु काशीद यांचे नावचा फेरफार 7/12 पत्रकी नोंद होणेकरीता 35,000/- दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी कोतवाल पाटील यांना काही कमी करा असे विनंती केली असता आमचे समोर असले तलाठी सोनवणे यांनी त्यांचे कॅलक्युलेटरवर 25,000/- रूपये टाईप करून, कॅलक्युलेटर मला दाखवून, एवढे तुम्हाला दयावे लागतील असे सांगितलेने मी तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांना सध्या माझेकडे ऐवढे पैसे नाहीत. मी पैशांची जुळणी करून येतो व आपणास भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलेलो आहे. त्यानंतर मी घरी जावुन माझे वडीलांना तलाठी सजा शहापुर कार्यालयातील तलाठी श्री. सोनवणे व कोतवाल पाटील हे तुमचे नावे इचलकरंजी गावातील गट नं. 729 मधील असले क्षेत्रास 7/12 पत्रकी

फेरफार करून तुमचे नाव नोंदविणेकरीता माझेकडे 25,000/- रूपये रक्कम मागत आहेत. सदरची रक्कम ही लाच म्हणुन ते मागणी करीत असलेची माझी व माझे वडीलांची खात्री झाली आहे. परंतु मला त्यांना लाच रक्कम देणेची इच्छा नाही. तसेच माझे व तलाठी सोनवणे साहेब व कोतवाल पाटील यांचे कोणतेही देवाण - घेवाणीचे व्यवहार नाहीत व त्यांचेशी माझा कोणताही वाद नाही. मी दिनांक 06/11/2025 रोजी तलाठी सजा कार्यालय शहापूर येथील तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांना भेटणेस जाणार असुन त्यांचेवर आपणाकडुन कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन लेखी तक्रार अर्ज दिला. काशीद यांनी तोंडी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे वडील राऊ परसु काशीद यांचे ते अॅन्टी करप्शन ब्युरोकडे करीत असले तक्रारीबाबत समंतीपत्र ही सादर केले. त्यावर आम्ही तसेच दोन्ही पंचानी सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार काशीद व पंच नं.01 डोंगळे यांचेसह तलाठी सजा कार्यालय शहापूर येथील तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांना भेटणेसाठी पाठवुन काशीद यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे नविन मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार काशीद व पंचाची खात्री करून दिली व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर तक्रारदार काशीद व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 13.06 वाजता चालु करून, तो तक्रारदार काशीद यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार काशीद व पंच नं.1 डोंगळे यांना तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांची भेट घेण्याकरीता, त्यांचे मोटर सायकल क्रमांक एम.एच. 51 डी. 7737 वरून शहापुर तलाठी कार्यालयात पाठविले. त्यांनतर काहीवेळाने तक्रारदार काशीद व पंच नं.1 डोंगळे असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 13.37 वाजता बंद केला. त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 डोंगळे यांना तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार काशीद यांचे सोबत शहापुर तलाठी कार्यालयासमोर गेलो त्यावेळी तक्रारदार काशीद हे शहापूर सजा कार्यालयात गेले. तेथे त्यांना कोतवाल पाटील भेटले त्यावेळी त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी तक्रारदार कोतवाल यांना "फेरफार नोंद कवा निघतीया, एकदा ते साहेबान्सी बोलुया , क्षेत्रफळ वाढवुयच हाय म्हणुन, ते डायरी घालुन, फेरफार करायचा हाय, ते ब्लॉक काढायचा आहे, बंॅकेच्या कामामुळ मला जरा.." असे विचारले त्यावेळी कोतवाल पाटील यांनी पंचासमक्ष हाताने पैशाचा इशारा करत (हाताचे बोटावरून अंगठा वर उडवत) "हेज काय" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार "आज आनलोय की, आणलोय म्हणजे आता पेढीवरन घेवुन येणार" असे म्हणाले. त्यावेळी कोतवाल पाटील "घेवुन येजा की.." असे म्हणुन तक्रारदारास पैसे घेवुन येण्यास सांगत आहेत. त्यावेळी तक्रारदार कोतवाल यांना साहेबांशी बोलतो असे म्हणुन तलाठी सोनवणे यांना भेटले. त्यावेळी तक्रारदार व तलाठी सोनवणे यांचेत त्यांचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार काशीद "माझ क्षेत्रफळ वाढवुन, ब्लॉक काढुन नाव लावायच हाय, बर ते नव्ह आता एक पंधरा हजार रूपये देवु काय वेळाण ..." असे म्हणाले त्यावेळी तलाठी सोनवणे "कुणाकड देणार मग?" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार काशीद "तुम्ही सांगा"....."का बाहेर जावुन बोलुया आपण" असे विचारले त्यावेळी तलाठी यांनी थांब जरा सांगतो असे म्हणाले. त्यांनतर तक्रारदार यांनी तलाठी सोनवणे यांना "नेताजी मामाला किती पंधरा दयायच नव्ह" असे म्हणाले. त्यावेळी तलाठी सोनवणे "दहा हजार" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार "हे बघा माझ बिल झालय आता तीस हजार, पंधरा हजार माझ कारखाण्यात झाल, म्हणजे पंधरा हजार घेवुन येतो, म्हणजे मला माझ हे करून दयायच" असे म्हणाले. त्यावेळी तलाठी सोनवणे "वीस..., नोंद घालुन दयायच " असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार कामाचे अनुषंगाने बोलुन "मग ते दहा हजार तुम्हाला देतो, चालतय काय? खर माझ आज हे यायला पाहिजे...." असे म्हणाले. त्यानंतर तलाठी सोनवणे यांनी तक्रारदार यांना त्यांचे खरेदी क्षेत्राचे अनुषंगाने माहिती विचारून त्याविषयी दोघांचे बोलने झाले. त्यावेळी तलाठी सोनवणे "घेवुन ये मग" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार काशीद "घेवुन येवु, किती पंधरा हजार आणु, आणि तुमच दहा हजार असे विचारले. त्यावेळी तलाठी सोनवणे यांनी हाताने नंतर असा इशारा केला त्यावेळी तक्रारदाराने "नंतर...." असे विचारले. त्यानंतर पुन्हा त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झालेनंतर आम्ही तेथुन निघुन आलो आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार काशीद यांना तलाठी पाटील व कोतवाल काशीद यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 डोंगळे यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार हे कोतवाल पाटील यांना भेटुन त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले तसेच तक्रारदार यांनी कोतवाल पाटील यांना "फेरफार नोंद कवा निघतीया, एकदा ते साहेबान्सी बोलुया , क्षेत्रफळ

वाढवुयच हाय म्हणुन, ते डायरी घालुन, फेरफार करायचा हाय, ते ब्लॉक काढायचा आहे, बं केच्या कामामुळ मला जरा.." असे विचारले त्यावेळी कोतवाल पाटील यांनी पंचासमक्ष हाताने पैशाचा इशारा करत (हाताचे बोटावरून अंगठा वर उडवत) "हेज काय" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार "आज आनलोय की, आणलोय म्हणजे आता पेढीवरुन घेवुन येणार" असे म्हणाले. त्यावेळी कोतवाल पाटील "घेवुन येजा की.." असे म्हणुन तक्रारदारास पैसे घेवुन येण्यास सांगत असल्याचे निषन्न झाले
तसेच पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार व तलाठी सोनवणे यांची भेट होवुन तक्रारदार यांचे वडीलांचे नाव सातबारा पत्रकी फेरफार करून नोंदविणेचे अनुषंगाने तलाठी सोनवणे व तक्रारदार यांचेत बोलने झालेचे तसेच तक्रारदार यांनी तलाठी सोनवणे यांना "माझ क्षेत्रफळ वाढवुन, ब्लॉक काढुन नाव लावायच हाय, बर ते नव्ह आता एक पंधरा हजार रूपये देवु काय वेळाण ..." असे म्हणाले त्यावेळी तलाठी सोनवणे "कुणाकड देणार मग?" असे म्हणाले. तसेच तक्रारदार यांनी सोनवणे यांना "नेताजी मामाला किती पंधरा दयायच नव्ह" असे म्हणाले. त्यावेळी तलाठी सोनवणे "दहा हजार" असे म्हणाले, त्यानंतर तक्रारदार "म्हणजे पंधरा हजार घेवुन येतो, म्हणजे मला माझ हे करून दयायच " असे म्हणाले. त्यावेळी तलाठी सोनवणे "वीस...," असे म्हणाले. तलाठी सोनवणे यांनी तक्रारदार यांचे वडीलांनी खेरदी केले क्षेत्रास तक्रारदार यांचे वडीलांचे नाव लावणेसाठी वीस हजार रूपयांची मागणी करून कोतवाल पाटील यांचेकडे 10,000/- रूपये देण्याय सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने आम्ही तलाठी सोनवणे व कोतवाल काशीद यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

त्यानंतर मी तक्रारदार काशीद यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 20 चलनी नोटा अशी 10,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार काशीद व पंचाना अ ॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, तसेच सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार काशीद व दोन्ही पंचाचे निवेदन घेतली. त्यानंतर अ ॅथ्रासिन लावलेले 10,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या पुढील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार काशीद, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार काशीद यांना कोतवाल पाटील किंवा तलाठी सोनवणे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांचे अंगावरील फुल शर्टच्या दोन्ही हातोप्याच्या बाहया खाली करण्याबाबत पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 16.04 वाजता सुरू करून तक्रारदार काशीद व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर रेकॉर्डर तक्रारदार काशीद यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार काशीद व पंच नं.1 डोंगळे यांना तक्रारदार यांचे मोटर सायकलने शहापुर तलाठी कार्यालयात पाठविले. त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.02 कुंभार असे आमचेकडील शासकीय बोलेरो वाहनाने शहापुर येथे आलो तेथे तलाठी तलाठी कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यावेळी शहापूर तलाठी कार्यालयास कुलुप लावुन बंद केलेले होते म्हणुन तक्रारदार काशीद यानी त्यांचे मो.नं.9370336223 वरून तलाठी सोनवणे यांचे मो.नं.8551845574 वरती फोन केला त्यावेळी तलाठी सोनवणे यांनी नगरपालीके जवळ येण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हाला त्यांचे मागोमाग येण्यास सांगितले त्यानंतर आम्ही सर्वजन तक्रारदार व पंच नं.1 डोंगळे यांचे मोटर सायकलचे पाठीमागुन जावु लागलो त्यावेळी तक्रारदार इचलकरंजी महानगरपालीकेजवळ आले त्यावेळी तक्रारदार कोतवाल नेताजी पाटील यांना तेथे भेटले. त्यावेळी कोतवाल पाटील यांनी तलाठी सोनवणे यांना फोन लावला असता तलाठी सोनवणे यांनी त्यांना तक्रारदार यांना घेवुन सलगर चहा चे दुकानाजवळ येण्यास सांगितले. त्यावेळी आम्ही पंच नं. 2 व सापळा पथक त्यांचे पाठोपाठ गेलो. सदर ठिकाणी तक्रारदार हे कोतवाल नेताजी व तलाठी सोनवणे यांना भेटले त्यावेळी आम्ही तेथे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यावेळी तलाठी सोनवणे तक्रारदार यांना "आता किती आणलाय" ? असे विचारले त्यावेळी तक्रारदार काशीद "आत्ता दहा आणलोय, पाच तुम्हाला उदया संध्याकाळ ...सकाळ पर्यंत देतो, ओके" असे म्हणुन तक्रारदार यांनी तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांनी मागणी केलेले 10,000/-रूपये तलाठी सोनवणे यांचेकडे दिले. त्यावेळी तलाठी पाटील यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे पाठीमागील बाजुच्या डाव्या बाजुचे खिशात ठेवली त्यावेळी कोतवाल नेताजी पाटील तक्रारदार यांना "ते नव्ह आता तुझ क्षेत्र किती लावायच हाय, तुझ क्षेत्र किती लावायच हाय.." असे म्हणाले. त्यावेळी काशीद "आता टोटल सोळाशे ऐंशी होतय बघा.." असे म्हणाले. त्यावेळी तलाठी सोनवणे "कागद झाला न..., कागद तुम्हाला काढुन देतो..." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार काशीद यांनी तलाठी सोनवणे यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 कुंभार व स्टाफ तेथे गेलो. त्यावेळी तक्रारदार काशीद यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 16.51 वाजता बंद करून तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांना पकडले. वरीलप्रमाणे सर्व हकीकत तलाठी सोनवणे व कोतवाल यांना पकडलेनंतर

आम्हाला तक्रारदार व पंच नं. 1 डोंगळे यांनी मिळतीजुळती सांगितली आहे. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यामध्ये तलाठी सोनवणे यांचे दोन्ही हाताचे बोटांना, दोन्ही हाताचे तळव्यावर व त्यांचे अंगावरील पॅन्टचे पाठीमागील बाजुचे डावे बाजुचे खिशाचे कडांना व खिशामध्ये आतील बाजुस अंथा्रसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदर घटनेचे व्हिडीओ शुटींग अमंलदार सुधिर पाटील यांनी केले आहे. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी, कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार संतोष राऊ काशीद यांचे वडील राऊ काशीद यांचे नाव इचलकरंजी येथील गट नंबर 729 मधील क्षेत्रास खरेदीनंतर फेरफार होवुन 7/12 पत्रकी नोंद करणेकरीता, तक्रारदार काशीद यांचेकडे तलाठी सोनवणे यांनी स्वतःसाठी 20,000/- रूपये बेकायदेशिरपणे लाचेची मागणी करून मागणी केलेल्या लाच रक्कमेपैकी 10,000/- लाच रक्कम कोतवाल पाटील यांचेकडे बेकायदेशिरपणे देणेस सांगितले. तसेच कोतवाल पाटील यांनी तक्रारदार यांना हाताने पैशाचा इशारा करत (हाताचे बोटावरून अंगठा वर उडवत) "हेज काय" असे म्हणुन लाच मागणी करून रक्कम "घेवुन येजा की " असे म्हणुन बेकायदेशिरप पणे लाच मागणी केली. त्यानंतर तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांनी मिळुन तक्रारदार याला बोलावुन घेवुन ते दोघे समवेत असताना तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेतील 10,000/- रूपये लाच रक्कम तलाठी सोनवणे यांनी तक्रारदार काशीद यांचेकडुन बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी 01) गणेश विष्णुपंत सोनवणे, वय - 32 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर सद्या रा. रामचंद्र जाधव त्यांचे घरी भाडयाने जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर, मुळ गाव वणी, ता.दिडोंरी जि.नाशीक, 02) नेताजी केशव पाटील, वय - 45 वर्षे, पद- कोतवाल, सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, रा. शहापुर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
SHARAD KAKA WAYDANDE
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
शिवाजीनगर पोलीस ठाणे
पुणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Shivaji Maruti Gayak
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 0